राज्यात करोना विषाणू (COVID-१९)चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यास्तव राज्यात मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली आढावा व उपायोजनांसाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः** करोना-२०२०/प्र क्र ५८/ आरोग्य ५,

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,

संकुल इमारत, ८ व १० मजला, नवीन मंत्रालय,

मुंबई- ४०० ००१.

दिनांक : १३ मार्च,२०२०

**प्रस्तावना :**

जगभरात सर्वत्र पसरत असलेला नविन करोना विषाणूचा प्रादुर्भाव व त्याच्या संसर्गाने बाधित होणाऱ्या रुग्णांची संख्या लक्षात घेता जागतिक आरोग्य संघटनेने आरोग्य विषयक आंतरराष्ट्रीय आपत्ती जाहिर केलेली आहे. या विषाणूचा प्रादुर्भाव रोखणे व प्रतिबंधीत उपाययोजना यासाठी जागतिक आरोग्य संघटना व आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून दैनंदिन स्वरुपात सूचना देण्यात येत आहेत.

महाराष्ट्र राज्यातही करोनाबाधित रुग्ण आढळल्याने आजारास प्रतिबंध व नियंत्रण यासाठी तातडीच्या व आपत्कालीन उपाययोजना सुरु करण्यात आलेल्या आहेत यात रुग्ण शोध मोहिम, रुग्णांचे विलगीकरण व एकंदरच विषाणू आजार प्रतिबंध व नियंत्रण या बाबी करण्यात येत आहेत. तसेच साथरोग अधिनियम, १८९७ मधील तरतूदी लागू करण्यात आलेल्या आहेत. या परिस्थितीत राज्यातील करोना बाधित रुग्णसंख्या आटोक्यात ठेवणे, प्रादुर्भाव रोखणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे याचा दैनंदिन आढावा घेण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. या संदर्भात पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

## शासन निर्णय :

करोना विषाणू आजार प्रतिबंध व नियंत्रण या संदर्भात दैनंदिन आढावा घेऊन आरोग्य विषयक आपत्कालीन स्थिती, विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याने तसेच यामध्ये विविध

विभागाचे सहकार्य व समन्वय अपेक्षित असल्याने याबाबत मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली एक विशेष समिती गठीत करण्यात येत आहे. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उच्चस्तरीय आढावा समिती:

| | |
|---|---|
| १) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| २) अप्पर मुख्य सचिव, (महसूल) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ३) अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ४) अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ५) अप्पर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ६) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | सदस्य सचिव |
| ७) प्रधान सचिव-२, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ८) प्रधान सचिव, पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ९) सचिव,(मदत व पुर्नवसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| १०) सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ११) सचिव, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| १२) सचिव, (सायबर सेल), मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| १३) आयुक्त, मुंबई महानगरपालीका, मुंबई | सदस्य |
| १४) आयुक्त, ठाणे महानगरपालीका, ठाणे | सदस्य |
| १५) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई | सदस्य |
| १६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| १७) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई | सदस्य |
| १८) आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई | सदस्य |
| १९) संचालक, वैद्यकिय शिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य |
| २०) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई / पुणे | सदस्य |
| २१) डॉ.पाशी, आरोग्य अधिकारी, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई | सदस्य |

**या समितीची उद्दीष्टे व कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहतील.**

१. राज्यातील करोना विषाणू संसर्ग परिस्थितीचे दैनंदिन आढावा घेणे व विश्लेषण करुन प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपाययोजना सुचविणे

२. सध्याच्या नियंत्रण व्यवस्थेत आवश्यक ते बदल सुचविणे

३. जागतिक आरोग्य संघटना, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून प्रसारित करण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांची राज्यस्तरीय अंमलबजावणी व समन्वय साधणे

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेताक २०२००३१३१७४४०२२९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

ARCHANA
VILAS
WALZADE

Digitally signed by ARCHANA VILAS WALZADE [illegible] c=PUBLIC HEALTH DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=ARCHANA VILAS WALZADE
Date: 2020.03.13 22:29:12 +05'30'

(अर्चना वालझाडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. अप्पर मुख्य सचिव, (महसूल) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
३. अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अप्पर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
७. प्रधान सचिव-२, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सचिव, (मदत व पुर्नवसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
११. सचिव, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. सचिव, (सायबर सेल), मंत्रालय, मुंबई
१३. आयुक्त, मुंबई महानगरपालीका, मुंबई
१४. आयुक्त, ठाणे महानगरपालीका, ठाणे
१५. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई
१६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई
१७. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

१८.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई
१९.संचालक, वैद्यकिय शिक्षण संचालनालय, मुंबई
२०.संचालक, आरोग्य सेवा-१/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई / पुणे
२१.डॉ.पारशी, आरोग्य अधिकारी, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई

**प्रत माहितीस्तव**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा .उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, नगरविकास विभाग / वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग / विधी व न्याय विभाग / ग्राम विकास विभाग
४. अपर मुख्य सचिव ,सचिव/प्रधान सचिव/सर्व मंत्रालयीन विभाग मुंबई ,
५. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई.
६. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव
७. सर्व विभागीय आयुक्त
८. सर्व जिल्हाधिकारी
९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व) जिल्हा परिषद ,
१०.अतिरिक्त संचालक (सर्व) आरोग्य सेवा ,
११.सहसंचालक (सर्व) आरोग्य सेवा ,
१२.उप संचालक (सर्व) आरोग्य सेवा ,
१३.जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)
१४.जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
१५.जिल्हा हिवताप अधिकारी सर्व
१६.मा. मंत्री (आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१७.मायांचे खाजगी सचिव (आरोग्य) राज्यमंत्री .
१८. सर्व सह सचिवसार्वजनिक आरोग्य विभाग ,उपसचिव/
१९.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे स्विय सहायक
२०.सर्व कार्यासन अधिकारी मुंबई ,मंत्रालय ,सार्वजनिक आरोग्य विभाग ,
२१.निवड नस्ती-आरोग्य ५